जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान 20 टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबवायाच्या योजना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक:मागास 1098/प्र.क्र.73/34
मंत्रालय,मुंबई-400 032,दि.20 ऑक्टोबर,1999.

वाचा:-

(1) शासन निर्णय,ग्राम विकास विभाग क्रमांक मागास 1089/प्र.क्र.418/34,दि.14 सप्टेंबर 1989
(2) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.555/34, दि.5 ऑक्टोबर, 1989
(3) शासन निर्णय,ग्राम विकास विभाग क्रमांक-मागास-1091/849/34,दि.12 जुलै 1991
(4) शासन परिपत्रक क्रमांक:पंरास1091/प्र.क्र.921/34,दि.31 जुलै 1991
(5) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास1092/प्र.क्र.1105/34,दि.14 मे 1993
(6) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.555/34,दि.5 जुलै 1990
(7) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.418/34,दि.3 सप्टेंबर 1990
(8) शासन परिपत्रक क्रमांक मागास-1089/प्र.क्र.418/34,दि. 8 जानेवारी 1991
(9) शासन निर्णय क्रमांक मागास-1089/प्र.क्र.938/34,दि.30 ऑगस्ट 1991
(10) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास-1093/सीआर-1109/34,दि.7 जानेवारी 1993
(11) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक-मागास-1093/प्र.क्र.1239/34,दि.1 सप्टेंबर 1993
(12) शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक-मागास-1093/सीआर-1265/34,दि.9 डिसेंबर 1993
(13) शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक-मागास-1096/प्र.क्र.1571/34,दि.16.11.1996.

प्रस्तावना:-

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:मागास 1093/सी.आर1265/34,दि.9.12.93

उपरोल्लेखित सर्व आदेश निष्प्रभावी करून व काही बाबतीत सुधारणा करून या निर्णयान्वये खालील प्रमाणे सर्वसमावेशक आदेश काढण्यात येत आहेत. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या किमान 20 टक्के इतकी रक्कम प्रतिवर्षी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व नवबौद्धांसाठी राखून ठेवून सदर रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करावी असे धोरणात्मक आदेश व त्यासंबंधीच्या मार्गदर्शक सूचना शासनाने उपरोक्त शासन निर्णय/परिपत्रकान्वये निर्गमित केल्या आहेत. त्याचप्रमाणे एकूण 20 टक्के रकमेपैकी 30 टक्के रक्कम

मागासवर्गीय महिलांसाठी खर्च करण्यात यावा असेही आदेश देण्यात आले आहेत. विशेष घटक योजनेखाली माग. वर्गीयांच्या विविध सामाजिक विकास योजना राबविल्या जात असल्यामुळे 20 टक्के उत्पन्नातून प्रामुख्याने मागासवर्गीयांच्या वैयक्तिक लाभाच्या व उत्पादक योजनांवर भर देण्यात यावा असेही आदेश दिलेले आहेत. तथापि, ही रक्कम निश्चित कोणत्या बाबींवर खर्च करावी याबद्दल स्पष्ट खुलासा नसल्यामुळे शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही जिल्हा परिषदांनी या निधीतुन जाहीराती, कार्यालयीन इमारत, नोकर वर्गातील पगार व दुरदर्शन संच/व्ही.डी.ओ. संच आदि मनोरंजक साधने खरेदी करणे, सहली दौरे इत्यादी बाबींवर खर्च केला आहे. हे अर्थातच शासन निर्णयास अनुसरुन नाही. अनुसूचित जाती कल्याण समितीच्या निदर्शनास ही बाब आली असता, समितीने असे सुचविले आहे की, जिल्हा परिषदा/पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नातील 20 टक्के निधीतून निश्चित कोणत्या योजना हाती घ्याव्यात व कोणत्या घेवू नयेत <u>याबद्दल शासनाने सर्व जिल्हा परिषदांना स्पष्ट आदेश देणे आवश्यक आहे</u>.

<u>शासन निर्णय:-</u>

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारणविभाग क्रमांक: मागास-1093/प्र.क.1239/34. दि.1.9.93

जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी परिच्छेद 2 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बाबींपासूनच्या उत्पन्नाच्या किमान 20 टक्के रक्कम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती विमुक्त जाती/भटक्या जमाती व नवबौध्दांच्या कल्याणासाठी राखून ठेवून खर्च करावी असे धोरणात्मक निदेश, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 च्या कलम 261 पोटकलम (1) खालील अधिकारांचा वापर करुन या निर्णयाद्वारे शासन असे आदेश देत आहे की, सदर रक्कम मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या सामुहिक विकासाच्या व वैयक्तिक लाभाच्या खालील बाबींवर खर्च करावी:-

**<u>1.2 जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या 20 टक्के मधून मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या सामुहिक विकासाच्या व वैयक्तिक लाभावर खर्च करावयाच्या बाबी:-</u>**

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक मागास 1089/प्र.क्र.418/34. दि. 14.9.1989

1) मागासवर्गीयासाठी बालवाड्या.
2) मागासवर्गीयांना नवीन घरबांधणीसाठी अगर दुरुस्तीसाठी अर्थसहाय्य.
3) मागासवर्गीयांना वसतीगृह, अभ्यासिका तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना/विद्यार्थीनींना गणवेश पुरविणे
4) आंतरजातीय विवाहित जोडप्यांना पूरक अर्थसहाय्य
5) मागासवर्गीयासाठी पाणीपुरवठा सोयी/विहीर दुरुस्त इत्यादी.
6) मागासवर्गीयांना लघुउद्योगासाठी अर्थसहाय्य, उदा. प्रशिक्षित मागासवर्गीयांना शिलाई मशिन पुरविणे, तेल ऑईल इंजीन, इलेक्ट्रिकल ओजार खरेदीसाठी अर्थसहाय्य इत्यादी.
7) मागासवर्गीय अनुदानित वसतिगृहातील मुलांच्या शैक्षणिक सहली.
8) मागासवर्गीयांना धार्मिक प्लॉटसाठी अर्थसहाय्य.

(3)

9) मागासवर्गीय वस्तीत जोडरस्ते बांधणे, रस्त्यावरील दिवाबत्ती.
10) मागासवर्गीय वस्तीमध्ये उद्याने/बगीचे/समाजमंदीरे, प्रौढ शिक्षण व्यवस्था, क्रीडांगणे, ग्रंथालये, इत्यादी.
11) प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील मागासवर्गीय हुषार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, पुस्तके, लेखन साहित्य गणवेश पुरविणे.

12) मागासवर्गीयांसाठी कमी खर्चाचे संडास
13) मागासवर्गीयांना घरगुती वापरासाठी विद्युत पुरवठा करणे.
14) मागासवर्गीय कुष्ठरोग्यांना पुनर्वसनासाठी अर्थसहाय्य
15) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वाचनालय/वर्ग चालू करणे.
16) समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणा-या हरिजन वस्त्यांची सुधारणा या योजनेअंतर्गत बांधलेल्या समाज मंदिराचे अपूर्ण काम पूर्ण करण्यास आर्थिक सहाय्य
17) व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांना मिळत असलेली शिष्यवृत्ती अपुरी पडत असल्यास अर्थसहाय्य
18) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे.
19) मागासवर्गीय लोकांना 20 टक्के उत्पन्नातून बायोगॅससाठी शेगडी, कॉक व पाईप इत्यादी साहित्याचा पुरवठा करणे.

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक-मागास1091/(849)/34, दि.12.7.91

20) जीवनधारा/जवाहर रोजगार योजनेअंतर्गत मागासवर्गीय लाभार्थ्यांचे विहीरीवर विजेचे पोल पुरविण्यासाठी अर्थसहाय्य देणे.

21) मागासवर्गीय एस.एस.सी अनुत्तीर्ण उमेदवारांना स्वयंरोजगाराला संधी उपलब्ध करुन देण्यासाठी वाहन चालकाचे प्रशिक्षण देणे.
22) गवती छप्पर बदलून घरावर टिनपत्रे घालणे.
23) मागासवर्गीय शेतक-यांना शेतीची अवजारे व बैलजोडी पुरविणे
24) बेघर भूमिहीन घरकुल योजनेखाली बांधलेल्या घरांना नागरी सुविधा पुरविणे

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक-मागास1092 प्र.क्र.1106/34, दि.14.5.93

25) सिंचन योजना (एकूण निधीच्या 25 टक्के जादा खर्च होणार नाही या अटीवर)

1.3 वर नमूद केलेल्या योजनांची यादी ही निदर्शनात्मक (इलस्ट्रेटिव्ह) असून ती परिपूर्ण (एक्झॉस्टिव्ह) नाही. अशाच प्रकारच्या इतरही अनेक सामुदायिक अथवा वैयक्तिक लाभाच्या सदभावमूलक योजना जिल्हा परिषदांनी स्वतः च्या अखत्यारीत संचालक, समाज कल्याण महाराष्ट्र यांच्या सल्ल्याने घ्यावात.

7.

वैयक्तिक लाभाच्या उत्पादक योजना हाती घेताना, अशा योजनांचा लाभ ज्या मागासवर्गीय कुटुंबांना योजनेचा लाभ द्यावयाचा आहे त्या लाभार्थींचे नांव, रु 20,000 एवढ्या मर्यादेपर्यंत वार्षिक कुटुंब उत्पन्न मर्यादा विहित करुन, स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना व त्यार संलग्न योजनेअंतर्गत सन 1998-99 साली झालेल्या दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणनेअंती तयार केलेल्या नविनदारिद्रय रेषेखालील कुटुंबाच्या यादीत असणे जरुरीचे आहे. तसेच एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस एकाच वेळी दुहेरी मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

1.4 (अ) जिल्हा स्तरीय कार्यवाही.

1) प्रत्येक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील वर्षाचे जिल्हा परिषदेचे उद्दीष्ट सर्व पंचायत समित्यांना प्रत्येक पंचायत समिती व प्रवर्गनिहाय 15 डिसेंबर पर्यंत कळवावे.

2) प्रवर्गनिहाय उद्दिष्ट वाटप करताना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पुढीलप्रमाणे प्राधान्यक्रम विचारात घ्यावे.

अ) दारिद्रय रेषेखालील मुक्त वेठबिगार.
ब) बाल कामगार असलेली दारिद्रय रेषेखालील कुटुंबे.
क) देवदासी असलेली दारिद्रयरेषेखालील कुटुंबे
ड) अपंग कुटुंब प्रमुख असलेली अथवा अपंग असलेली कुटुंबे.
इ) दारिद्रय रेषेखालील अनुसूचित जाती/जमाती कुटुंब संख्या.
ई) दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची जास्त संख्या असलेले गट.

(ब) पंचायत समिती स्तरीय कार्यवाही.

1) पंचायत समितीसाठी प्राप्त उद्दिष्टांचे गट विकास अधिका-यांना प्रत्येक पंचायत समिती गणामध्ये (Panchayat Samiti Electoral Collegewise) प्रवर्ग निहाय वाटप करावे.

2) गट विकास अधिका-यांना या पंचायत समिती गणनिहाय उद्दिष्ट त्या गणामधील गावांना 31 डिसेंबर पूर्वी प्राधान्यक्रम लक्षात घेऊन वाटप करावे.

3) गट विकास अधिका-यांनी गाव निवडीसाठी खालील पध्दत अंमलात आणावी.

1) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निश्चित केलेली दारिद्रय रेषेखालील कुटुंबांची यादी पंचायत समितीकडे उपलब्ध असते. या यादीतील ज्या गावात मागासवर्गीय कुटुंबाचे प्रमाण सर्वात जास्त आहे, अशी गावे सर्वप्रथम घेऊन त्यानंतर मागासवर्गीय कुटुंबाच्या उतरत्या प्रमाणात इतर गावे घेऊन अशा गावांची स्वतंत्र यादी तयार करावी व जिल्ह्यातील अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या यांच्या लोकसंख्येच्या आधारावर हा खर्च करावा.

2) जिल्हा परिषदेने दिलेले उद्दीष्ट विचारात घेऊन गावांच्या स्वतंत्र यादीतील उतरत्या क्रमाने गावांची निवड करावी.

3) निवडलेल्या गावांपैकी एखादे गावात जर ही योजना यापूर्वी जास्त प्रमाणात राबविली गेली असल्यास असे गाव वगळावे

व त्याऐवजी अजिबात योजना न राबविलेल्या अथवा अत्यल्प प्रमाणात लाभ दिलेल्या गावांची निवड करावी.

4) पुढील वर्षी गावे निवडतांना त्यापूर्वी लाभ दिलेल्या गावांना वगळावे व गावांच्या यादीतील त्यापुढच्या गावांना निवडावे.

(क) ग्राम स्तरीय कार्यवाही –

ग्राम सेवकांनी दिनांक 26 जानेवारीच्या ग्रामसभेमध्ये विहित उद्दिष्टानुसार लाभार्थी निवडण्याचा विषय ठेवावा अथवा आवश्यकता वाटल्यास यासाठी स्वतंत्र ग्रामसभा बोलवावी. ग्राम सभेची बैठक आयोजित करण्यासाठी जास्तीत जास्त लोकांना भाग घेता यावा म्हणून :-

1) प्रभावी प्रसिध्दी द्यावी व बैठकीची सूचना कमीत कमी 15 दिवसापूर्वी द्यावी.
2) गावच्या दर्शनिक ठिकाणी व विद्युत खांब इत्यादी ठिकाणी माहिती पत्रके माहितीसाठी लावावी.
3) संबंधित गावात वाडीत याबाबतची दवंडी पिटवावी.
4) संबंधित ग्राम पंचायत, संबंधित पंचायत समितीमध्ये याबाबतची लेखी सूचना लावावी.
5) आणि संबंधित गावात समाजमंदिर आहे तेथे सुध्दा लेखी सूचना लावाव्या.

1.5 लाभार्थी निवडीची कार्यपध्दती.

1) वैयक्तिक लाभाच्या उत्पादक योजना हाती घेताना अशा योजनांचा लाभ ज्या मागासवर्गीय कुटुंबाना द्यावयाचा आहे त्या लाभार्थीचे नाव रु. 20,000 एवढ्या मर्यादेपर्यंत वार्षिक कुटुंब उत्पन्न मर्यादा विहीत करुन स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना व इतर संलग्न योजनेअंतर्गत सन 1998-99 साली झालेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंब गणनेअंती तयार केलेल्या नविन दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाच्या यादीत असणे जरूरीचे आहे. [एकाच योजनेचा लाभ लाभार्थीस एकावेळी दुहेरी मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.]
2) लाभार्थीची निवड ग्रामसभेमध्ये करण्यात यावी.
3) ग्राम सभेमध्ये जास्तीत जास्त लोकांना भाग घेता यावा यासाठी वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार याबाबतची माहिती सर्व संबंधितांना मिळेल अशी व्यवस्था करावी.
4) या ग्रामसभेपुढे ग्रामसेवकांनी योजनेच्या लाभधारक निवडीचे निकष व इतर माहिती सविस्तर द्यावी.
5) ग्राम सेवकाने दारिद्र्यरेषेखालील अनुसुचित जाती/जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, नवबौध्द लोकांचे यादीचे वाचन करावे व या योजनेखाली आतापर्यंत लाभ दिलेल्या लोकांची माहिती प्रथम द्यावी.
6) त्या आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदान विचारात घेऊन किती लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे, याचे नियोजन करुन त्याची माहिती ग्रामसभेत द्यावी.
7) आतापर्यंत लाभ न दिलेल्या लोकांना प्राधान्य देण्याबद्दल व विहित नियमांच्या अधीन राहून त्याची निवड करण्याबद्दल उपस्थितांपुढे प्रस्तावित करावे.

8) प्रत्यक्ष लाभार्थ्यांची ग्रामसभेच्या मान्यतेने निवड करण्यात यावी.

9) ग्राम सभेचे कार्यवृत्त सविस्तर लिहून पुढील ग्रामसभेत त्यास मान्यता घ्यावी.

योजनेचे लाभार्थी/ दिलेली रक्कम /कोणत्या कामासाठी मदत दिली याची माहिती पुढील ग्राम सभेत परिक्षणासाठी सादर करावी.

वर नमूद केलेल्या कार्यवाहीनंतर आलेल्या अर्जातून आधी नमूद केलेल्या निकषाप्रमाणे लाभार्थींची निवड करावी.

2. <u>जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी 20 टक्के रक्कमेसाठी विचारात घ्यावयाच्या उत्पन्नाच्या बाबी.</u>

जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी त्यांना मिळणा या खालील बाबीपासूनचे उत्पन्नाचे 20 टक्के रकमेसाठी विचारात घ्यावे:-

1)महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 चे कलम 157 खाली जिल्हा परिषदेने बसविलेले कर व शुल्क

2)सदर अधिनियमाच्या कलम 155(1)खाली जमीन महसूलावरील उपकरात होणारी वाढ

3)सदर अधिनियमाच्या कलम 155(2)अन्वये पंचायत समित्यांना सुचविलेली जमीन महसुलावरील उपकरात होणारी वाढ

4)सदर अधिनियमाच्या कलम 144,151 व 152 खाली बसविलेला जमीन महसुलावरील दर रुपयामागे 20 पैसे जमीन उपकर

5)उपकर सापेक्ष अनुदान

6)सदर अधिनियमाच्या कलम 158(3)खाली मिळणारे मुद्रांक शुल्क अनुदान (पंचायतीचा वाटा वगळून)

7)सदर अधिनियमाच्या कलम 150(2),151-अ (3) वा 152-एक(3)अन्वये देय असलेले पाणी पट्टीवरील उपकरापासूनचे उत्पन्न

3. <u>जिल्हा परिषद व पंचायत समितींनी 20 टक्के रक्कमेतून खर्च न करण्याच्या बाबी.</u>

I.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग मांक:मागास: 10८./ क्र.418/34.दि.14.9.39

शासन असेही आदेश देत आहे की,उपरोक्त निधीतील रक्कम खालील योजनांवर खर्च करण्यात येऊ नये:-

1)कार्यालयीन इमारतीचे बांधकाम

2)कर्मचा-याचे वेतन/भत्ते

3)मनोरंजनात्मक व प्रेक्षणीय स्थळांना भेटीसाठी आयोजित केलेल्या सहली अथवा अधिका-यांचे दौरे.

4)दूरचित्रवाणी संच अथवा तत्सम चैनीच्या वस्तुंची खरेदी

5)जाहीरातीवरील खर्च

6)पुतळे/स्मारके उभारणे

7)हरिजन सप्ताह साजरा करणे,मेळावे आयोजित करणे

10 12

(7)

## 4. लाभार्थ्यांच्या निवडीमध्ये अनियमितता होऊ नये म्हणून आवश्यक नोंदवह्या

सर्व जिल्हा परिषदांनी सोबतच्या प्रपत्रामध्ये लाभार्थ्यांची नोंदवही तयार करून मागासवर्गीय जातीनिहाय/गावनिहाय लाभ दिलेल्यांच्या याद्या तयार कराव्यात.ज्यावेळी लाभार्थ्यांना वैयक्तिक सहाय्य दिले जाईल त्यावेळी लाभधारकांची व दिलेल्या सहाय्याची नोंद नोंदवहीत घेण्यात यावी. एकाच कुटुंबातील एकाच व्यक्तीला त्यावर्षी पुन्हा पुन्हा या योजनेचा लाभ मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.जेव्हा या यादीतील सर्व लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळेल तेव्हा त्या कुटुंबातील दुसरी व्यक्ती लाभ घेण्यास पात्र ठरेल.ही वही गट विकास अधिकारी यांनी नियमित तपासावी.त्याचबरोबर संबंधित समाजकल्याण अधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीही त्यांच्या भेटीच्या वेळी नोंदी तपासून पहाव्यात.आयुक्त किंवा सहाय्यक आयुक्त(विकास) हे दौ-यावर असतील किंवा कार्यालय निरीक्षणाचे वेळी जातील तेव्हा या नोंदवह्यांची तपासणी करावी.नोंदवही विवरणपत्र "अ" प्रमाणे ठेवण्यात यावी.त्याचप्रमाणे ग्राम पंचायतीमध्ये अशा योजनांबाबत रजिस्टर ठेवून नोंद घ्यावी तसेच एखादे घर त्या योजनेखाली बांधले असल्यास त्या घरावर पंचायत समिती/जिल्हा परिषद अनुदानित व संबंधित वर्ष लिहीण्यात यावे.या योजनेमध्ये घेतलेल्या प्रकरणाची माहिती ग्रामसभेमध्ये देण्यात यावी. जेणेकरून सामाजिक बंधन राहील.

या.परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक- मागास 1089/प्र.क्र.555/34, दि.5.10.89

### 5. योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात जबाबदार अधिकारी

5. जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने परिच्छेद 2 मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींपासूनचे बाब-निहाय एकूण उत्पन्न व त्याच्या 20 टक्के रक्कम यांची माहिती संबंधित समाजकल्याण अधिकारी यांना कळवावी. सदर रक्कम जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाने समाजकल्याण विभागाला उपलब्ध करून द्यावी.जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समिती व समाजकल्याण विभाग यांनी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजना आखून त्यांची परिणामकारक अंमलबजावणी करावी व 20 टक्के रक्कम त्याचवर्षी खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी.उपरोक्त सर्व बाबींपासूनच्या उत्पन्नाची 20 टक्के रक्कम ही मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांवर योग्य त-हेने व त्याच आर्थिक वर्षात होते की नाही,हे पाहण्याची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व समाजकल्याण अधिकारी यांची असून रक्कम खर्ची न पडल्यास त्यांना जबाबदार धरले जाईल.जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण समितीने सुध्दा याबाबत वेळोवेळी पाठपुरावा करून 20 टक्के रक्कमेची तरतूद करून घ्यावी व ती रक्कम त्याच वर्षी खर्च होईल याची दक्षता घ्यावी.20 टक्के रक्कमेच्या अनुशेषाच्या संनियंत्रणाची जबाबदारी शासन पत्र क्रमांक विकला-108/प्र.क्र.499/34,दिनांक 5 जुन 1989 अन्वये विभागीय सहाय्यक आयुक्त(विकास) यांच्यावर सोपविण्यात आली आहे.त्यानुसार त्यांनी 20 टक्के रक्कमेचे नियंत्रण व सदर रक्कमेतून घेण्यात येणा-या योजनांची अंमलबजावणी योग्य त-हेने होते किंवा नाही हे पहावे.जिल्हा परिषदेने योजनांवरील खर्चाचे त्रैमासिक अहवाल पुढील महिन्याच्या 10 तारखेपर्यंत संबंधित विभागीय सहाय्यक आयुक्त(विकास) यांच्याकडे

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारणविभाग क्रमांक- मागास 1093/प्र.क्र.12/34, दि.1.9.93

पाठवावेत.सोबतच्या "ब" विवरणपत्रात त्रैमासिक अहवाल पाठवावेत.

**6. शासनाने मंजूर केलेल्या विकास योजनांवर खर्च करण्याची मर्यादा नविन योजनांचे प्रस्तावावर विभागीय समाजकल्याण अधिकारी मार्फत संचालक,समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांची मंजूरी आवश्यक**

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:मागास 1093/ प्र.क्र.1239/34,दि.1.9.93

ज्या विकास योजना शासनाने मंजूर केल्या आहेत अशा योजनांना विभाग प्रमुखांना रु.50,000/- पर्यंत खर्च करण्याची अनुमती असून,इतर योजनांना रु.30,000/- पर्यंत खर्च करण्याची अनुमती आहे.तथापि या निर्णयाच्या परिच्छेद 1 मध्ये नमूद केलेल्या बाबींवर खर्च करण्यापूर्वी ज्या योजना नित्य स्वरुपाच्या (रुटीन) असून पूर्वी त्यांना तांत्रिक मंजूरी दिली आहे अशा योजनांच्या बाबतीत पुन्हा तांत्रिक मंजूरी देण्याचा प्रस्ताव संचालक,समाजकल्याण,पुणे यांना पाठविण्याची जरुरी नाही.तथापि अशा योजनाव्यतिरिक्त काही नवीन योजना असतील तर त्यांचे प्रस्ताव जिल्हा परिषदांनी संबंधित विभागीय समाजकल्याण अधिकारी यांच्यामार्फत संचालक,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्याकडे मंजूरीसाठी पाठवावेत व आवश्यकता वाटल्यास सदर प्रस्ताव संचालकांनी ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांचेकडे पाठवावेत.

शा.परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र:मागास 1093/सीआर1109/34, दि.7.1.93

**7. योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वार्षिक आखणी**

7. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी 20 टक्के रकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणाकरीता परिच्छेद 1 मध्ये नमूद केल्याप्रमाणे योजना घ्याव्यात,तसेच त्यासारख्या इतर योजनासुध्दा जिल्हा परिषदांनी स्वतःच्या अखत्यारीत संचालक,समाजकल्याण यांच्या सल्ल्याने घ्याव्यात.मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राखून ठेवलेली 20 टक्के रक्कम ही त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना आखून त्याच वित्तीय वर्षी खर्ची पडेल या दृष्टीने लाभार्थींचे अर्ज स्वीकारताना मूळातच ते परिपूर्ण असावेत याची दक्षता घेण्यात यावी.त्यामुळे कार्यान्वित करण्यात येणा-या योजनांची अंमलबजावणी सत्वर होऊन रक्कम अखर्चित राहणार नाही व सदर रकमेचा अनुशेषही राहणार नाही.अशा योजना वर्षाच्या सुरुवातीपासूनच आखण्यात याव्यात.हा कार्यक्रम प्रभावीपणे अंमलात येण्यासाठी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मासिक कृती कार्यक्रम तयार करुन दर महिन्यास आढावा घ्यावा.तसेच संबंधित विभागीय आयुक्तांनी सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मासिक बैठकीमध्ये आढावा घ्यावा.योजनांची अंमलबजावणी करण्यास दुर्लक्ष करणा-या अधिका-यावर योग्य ती शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.या योजनेचा कार्यक्रम सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे आखण्यात यावा:-

शा.परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक: पंरास 1091/प्र.921/34, दि.31.7.91

| | |
|---|---|
| 1)एप्रिल | लाभार्थींचे सर्वेक्षण करुन यादया तयार करणे |
| 2)मे | यादयांची पडताळणी |
| 3)जून | लाभार्थींच्या यादया निश्चित करणे,लाभार्थींची निवड करणे |

| | |
|---|---|
| 4)जुलै | योजनेच्या अंमलबजावणीचे प्रस्ताव तयार करणे |
| 5)ऑगस्ट | साधनसामुग्रीची खरेदी करणे |
| 6)सप्टेंबर | लाभार्थींना योजनेचा प्रत्यक्ष लाभ देणे |
| 7)ऑक्टोंबर | कार्यक्रमाचा आढावा घेऊन उणिवा भरुन काढणे. |
| 8)नोव्हेंबर व डिसेंबर | मागील राहीलेले काम पूर्ण करणे. |

**8. शासकीय अनुदान प्राप्त मागासवर्गीयांच्या योजनासाठी 20 टक्के रक्कमेतून तात्पुरता सुध्दा खर्च न करण्याबाबत**

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांकः मागास1098/प्रक्र.418/34, दि.14.9.89

मागासवर्गीयासाठी असलेल्या ज्या योजनांना शासकीय अनुदान प्राप्त होते, किंवा ज्या योजनेमध्ये मागासवर्गीयांना मान्य प्रमाणात मदत मिळते, अशा योजनांसाठी जिल्हा परिषदांना स्वतःच्या उत्पन्नातील 20 टक्के रक्कमेतून तात्पुरता सुध्दा खर्च करणे ही बाब तत्वतः उचित होणार नाही. (उदा. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत 50 टक्के मागासवर्गीय लाभार्थींचे उद्दीष्ट असून विहिरीचे खोदकाम, पंप बसविणे, विद्युत मोटार बसविणे , डिझेल इंजिन बसविणे, दुभती गुरे, शेळ्या, बक-या ,डुकरे, कोंबड्या यांचे वितरण करणे, नांगर, बैल, बैलगाड्या पुरविणे इत्यादी लाभ देण्यात येतात तसेच कृषि विभागामार्फत मागासवर्गीयांना निविष्ठा पुरवठा, पीक संरक्षण अवजारे, जमीन सुधारणा, बैलजोडी/रेडेजोडी, बैलगाडी, पशुसंवर्धन विभागामार्फत मेंढ व लोकर विकास, वैरण विकास वगैरे योजनेचे लाभ मागासवर्गीयासाठी देण्यात येतात)

**9 सामुहिक विकासाची योजना कार्यान्वित करण्यापूर्वी विचारात घ्यावयाच्या बाबी.**

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक:मागास 1089/ प्र.क्र.418/34.दि.14.9.89

20 टक्के रक्कमेतून आदिवासी उपयोजना क्षेत्रात एखादी सामूहिक विकासाची योजना कार्यान्वित करण्यापूर्वी जिल्हा परिषदेने संबंधित प्रकल्प अधिकारी ,आदिवासी विकास विभाग यां शाशी संपर्क साधावा.त्याचप्रमाणे प्राग्रख्याने मागासवर्गीय वस्ती असलेल्या भागात अशा सामुहिक लाभाच्या योजना घेण्यापूर्वी त्यांना संबंधित विभागीय समाज कल्याण अधिका-यांशी संपर्क साधावा.जर अशा सामूहिक योजना शक्यतो आदिवासी उपयोजनेच्या निधीतून अथवा विशेष घटक योजनांतर्गत असलेल्या निधीतून घेणे.शक्य असल्यास या 20 टक्के राखीव निधीतून त्या कामासाठी विनियोग करु नये.शासकीय निधीतून किंवा आदिवासी उपयोजनेखाली निधीतून योजना घेणे शक्य नसेल तरच मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या 20 टक्के निधीतून योजना घ्याव्यात.

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारणविभाग क्रमांक- मागास 1089/प्र.938/34, दि.30.4.91

**10. / 20 टक्के रक्कमेतून करावयाच्या खर्चासाठी जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, नवबौध्द यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणाचा आधार.**

13

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारणविभाग क्रमांकः मागास1089/प्र.क्र.418/34, दि.14.9.89

20 टक्के निधीतून मागासवर्गीयांसाठी विकास योजनेवर करावयाचा खर्च अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त जाती व भटक्या जमाती,नवबौध्द यांच्या जिल्हयामधील लोकसंख्येच्या प्रमाणाच्या आधारावर करण्यात यावा.तसेच पंचायत समित्यांनी सुध्दा याच प्रमाणात खर्च करावा.

## 11. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी तयार केलेल्या योजनांसाठी लाभार्थी उपलब्ध होत नसल्यास

शा.नि.ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांकः- मागास1093/प्र.क्र.1239/34,दि.1.9.93

11. जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी 20 टक्के रवकमेतून मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी तयार केलेल्या योजनांसाठी लाभार्थी उपलब्ध होत नसतील तर त्यांनी जिल्हा व्यवस्थापक ,महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ ,आण्णा भाऊ साठे मातंग विकास महामंडल व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ व संबधित प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास विभाग यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून लाभार्थी उपलब्ध करुन घ्यावेत

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जयलक्ष्मी चेवकला)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

1) विभागीय आयुक्त (सर्व)
2)सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
3)संचालक,समाज कल्याण संचालनालय,पुणे
4)सचिव,समाज कल्याण,सांस्कृतिक कार्य,क्रिडा व पर्यटन विभाग,मंत्रालय,मुंबई-32
5)महालेखापाल,मुंबई (लेखापरिक्षण)
6)महालेखापाल 2,नागपूर (लेखा परिक्षण)
7)महालेखापाल,महाराष्ट्र 1,मुंबई(लेखा व अनुज्ञेयता)
8)महालेखापाल ,महाराष्ट्र 2,नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
9)आयुक्त आदिवासी विकास,नाशिक.
10)सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
11)सचिव, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग.

पुराडउपार्थ २६१०१६
C:\desk34\er13.doc